# धडा पाठ 20

## देणगी चिपकोची!

पांडे : तू इतकं चांगलं हिंदी कसं बोलतोस?

बापट : अरे, ही चिपकोची देणगी आहे.

पांडे : चिपकोची देणगी?

बापट : हो ना! चिपको आंदोलन त्यावेळी नुकतंच सुरू झालं होतं. आम्ही पंधरावीस जणांनी त्याची पूर्ण माहिती मिळवायचं ठरवलं. सबंध गढवालची भटकंती केली. आम्ही अलकनंदेच्या किनाऱ्यावरील गावन् गाव भटकत असू. त्याचवेळी हिंदी शिकलो. बेधडक बोलायचो. चुकलो तर चुकलो. खरं सांगायचं तर प्रेमाची, माणुसकीची भाषा एकच असते. मग तो गढवाल असो किंवा महाराष्ट्र असो.

पांडे : ते खरं आहे. पण मग परत आल्यावर चिपको आंदोलनाच्या बाबतीत काय करत असता?

बापट : आम्ही मग महाराष्ट्रतही चिपको आंदोलन सुरू केलं.

पांडे : ते कसं?

बापट : आम्ही जंगलातल्या वस्त्यांमधे जायचो. लोकांना जंगलांचं महत्त्व पटवून द्यायचो.

पांडे : भाषणं द्यायचात?

बापट : छे रे! आम्ही गावकऱ्यांत मिसळायचो. आमच्यापैकी कुणी चित्रं काढी, कुणी गाणी म्हणी, कुणी फोटो काढी, कुणी नुसतेच गावकऱ्यांशी गप्पा मारत असे. आमच्यातल्या मुली तर गावातल्या बायकांशी दुधात पाणी मिसळल्यासारख्या एकरूप व्हायच्या।

## चिपको की देन!

पांडे : तुम इतनी अच्छी हिंदी कैसे बोलते हो?

बापट : अरे, यह चिपको की देन है।

पांडे : चिपको की देन?

बापट : हाँ, न। चिपको आंदोलन तब शुरु ही हुआ था। हम कोई पंद्रह बीस लोगों ने उसके विषय में पूरी जानकारी प्राप्त करने की ठानी। पूरे गढ़वाल का चक्कर लगाया। अलकनंदा के किनारे के गाँव-गाँव (हम) घूमा करते थे। उसी समय हिंदी सीखी। बेधड़क बोलते थे। भूल हो गई तो हो गई। सच तो यह है कि प्रेम की, या मानवता भाषा एक ही है। फिर चाहे वह गढ़वाल हो या महाराष्ट्र हो।

पांडे : यह तो सच है। पर वापस आने के बाद चिपको आंदोलन के बारे में क्या करते रहते हो?

बापट : हमने फिर महाराष्ट्र में भी चिपको आंदोलन शुरु किया।

पांडे : वह कैसे?

बापट : हम जंगल की बस्तियों में जाया करते थे। लोगों को जंगलों का महत्त्व समझाते थे।

पांडे : भाषण दिया करते थे?

बापट : नहीं रे। हम गाँव वालों से हिल-मिल जाया करते थे। हम में से कुछ (लोग) चित्र बनाया करते थे, कुछ (लोग) गाना गाया करते थे, कुछ (लोग) फोटो खींचा करते थे और कुछ जाकर गाँव वालों के साथ बातें किया करते थे। हमारे साथ की लड़कियाँ तो गाँव की स्त्रियों के साथ ऐसे घुल-मिल गईं जैसे दूध में पानी।

पांडे : त्याचा परिणाम व्हायचा?

बापट : भरपूर! झोपलेले गावकरी पटापट जागे व्हायचे. सगळीकडे जंगलवासियांचा अनुभव तोच असायचा. त्यांची दुःखही तीच असायची आणि समस्याही त्याच असायच्या. त्यामुळे स्थळकाळाची बंधनं गळून पडायची.

पांडे : मी तुमच्या पथनाट्याबद्दलही ऐकलं आहे.

बापट : आमची पथनाट्ये तर फारच प्रभावी ठरली. आम्ही बोलत बोलत गावातली माहिती गोळा करायचो. त्यावरच उत्स्फूर्त संवाद तयार करायचो. चिपको आंदोलनातील झाडं वाचवायचे नाना उपाय त्यांना नाटकांतून सांगायचो. सर्वात जास्त प्रभाव पडायचा तो बायकांवर!

पांडे : हल्ली तुम्ही काय करीत असता? अजूनही तुम्ही जंगलात जात असता का? तुमचं आंदोलन चालू आहे का?

बापट : हो-हो! अजूनही चालूच आहे. सगळे आपापल्या कामात मग्न असतो तरीही महिन्या दोन महिन्यातून एखादी वारी असतेच जंगलात.

पांडे : पुढच्या वेळेपासून मलाही सांगत जा. मीही येत जाईन तुमच्याबरोबर. चिपको आंदोलनाचं काम करत जाईन. त्यातून मला मानसिक समधानही मिळत जाईल.

पांडे : इसका असर होता था?

बापट : पूरा-पूरा। सोए हुए ग्रामवासी फटाफट जागृत हो जाते थे। हर जगह के वनवासियों का अनुभव तो एक जैसे ही होता था। उनके दुख भी वही होते थे और समस्याएँ भी वही होती थी। इसलिए स्थानकाल के बंधन टूटते जाते थे।

पांडे : मैंने तुम्हारे नुक्कड़ नाटकों के बारे में भी सुना है।

बापट : हमारे नुक्कड़ नाटक बहुत ही प्रभावी सिद्ध हुए। हम बोलते बोलते गाँव की पूरी जानकारी इकट्ठी कर लेते थे। उसी के ऊपर ही हम फौरन संवाद गढ़लिया करते थे। चिपको आंदोलन के पेड़-पौधे बचाने के नाना प्रकार के उपाय हम नाटकों द्वारा बताया करते थे। सबसे अधिक प्रभावित हुआ करती थीं महिलाएँ।

पांडे : आज कल आप क्या करते रहते हो? आप अभी भी जंगल में जाते रहते हो क्या? आपका आंदोलन चालू है क्या?

बापट : हाँ-हाँ! आज भी चल रहा है। हम सभी अपने अपने कामों में व्यस्त रहते हैं। फिर भी महीने-दो महीने में जंगल का एक चक्कर अवश्य ही लगा लेते हैं।

पांडे : अगली बार से मुझे भी बताया करो। मैं भी तुम्हारे साथ आया करूँगा। चिपको आंदोलन का काम किया करूँगा। उससे मुझे मानसिक समाधान भी मिलता रहेगा।

**शब्दार्थ**

| | |
|---|---|
| बोलतोस | बोलते हो |
| देणगी | देन |
| आंदोलन | आंदोलन |
| नुकतेच | तब ही |
| माहिती | जानकारी |
| मिळवायचं ठरवलं | प्राप्त करने की ठानी |
| भटकंती | भटकन |
| त्याच वेळी | उसी समय |
| बेधड़क | बिना झिझक |
| चुकले तर चुकलो | भूल हो गई तो हो गई |
| खरं सांगायचं तर | सच तो यह है |
| माणुसकीची | मानवता की |
| मग | फिर |
| खरं | सच |
| परत | वापस |
| काय करत असता | क्या करते रहते हो |
| आम्ही | हमने |
| सुरुं केलं | शुरु किया |
| ते कसं | वह कैसे |
| वस्ती | बस्ती |
| लोकांना | लोगों को |
| भाषण देणे | भाषण देना |
| छे रे | नहीं भाई/नहीं रे |
| मिसळणे | हिलमिल जाना, घुलमिल जाना |
| चित्र काढणे | चित्र बनाना |
| गाणी गाणे | गाने गाना |
| दुधात पाणी | दूध में पानी |
| सारख्या | के समान |
| एकरूप होणे | एकरूप होना |
| परिणाम | असर |
| झोपलेले | सोये हुए |
| पथनाट्य | नुक्कड़ नाटक |
| ऐकलं आहे | सुना है |
| प्रभावी | प्रभावकारी |
| माहिती | जानकारी |
| सर्वात जास्त | सबसे अधिक |
| चालू असणे | चालू रहना |
| मग्न | व्यस्त |
| वारी | परिक्रमा |

## अभ्यास

I खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

1) बापट चांगलं हिंदी का बोलू शकत होते?

2) बापट आणि त्यांच्या मंडळींना 'चिपको' आंदोलना बद्दलची माहिती मिळविण्यासाठी कुठे कुठे भटकावे लागले?

3) गढवालची भटकंती करून परत आल्यावर बापटांनी काय केलं?

4) गावातील लोकांना झाडांचं महत्त्व बापट व मंडळी कशा तऱ्हेने समजावून सांगत असत?

II पाठ वाचून खाली दोन भागात दिलेल्या वाक्यांशांच्या योग्य जोड्या लावून वाक्ये बनवा.

| | |
|---|---|
| चिपको आंदोलन | महत्त्व पटवून द्यायचो. |
| अलकनंदेच्या किनाऱ्यावरील | खूप मिसळायचो. |
| माणुसकीची भाषा | नाटकातून सांगायचो. |
| लोकांना जंगलाचं | गाव न् गाव भटकलो. |
| झाडं वाचवायचे उपाय | नुकतंच सुरु झालं होतं. |
| आम्ही गावकऱ्यांत | एकच असते. |

III अधोरेखित शब्दाबद्दल कंसात दिलेल्या शब्दांची योग्य रूपे वापरून वाक्ये बनवा.

1) मी रोज शाळेत <u>जायचो</u>. (झोप), (खेळ)

2) मी रोज लवकर <u>झोपायची</u>. (ऊठ), (जेव)

3) तू वह्या <u>आणायचीस</u>. (ने), (पाड)

4) तू सारखा <u>पडायचास</u>. (रड), (हस)

5) आपण/आम्ही भरभर <u>जेवायचो</u>. (चाल), (आवर)

6) आपण/तुम्ही कधीकधी <u>यायचात</u>. (रागव), (खेळ)

7) रमा स्वयंपाक <u>करायची</u>. (बिघडव), (सांड)

8) राम सायकल <u>चालवायचा</u>. (पाड), (पळव)

9) मांजर झाडाखाली <u>बसायचं</u>. (झोप), (खेळ)

10) रमाबाई लवकर <u>झोपायच्या</u>. (ऊठ), (जा)

11) रामभाऊ भरभर <u>चालायचे</u>. (बोल), (जेव)

12) मांजरं सारखी <u>भांडायची</u>. (खेळ), (झोप)

IV उदाहरणानुसार खालील वाक्ये नकारार्थी करा.

*उदाहरण:* मी गावाला <u>जायची</u>. मी गावाला <u>जायची नाही</u>.

1) सुनीता फुलांच्या माळा करायची.

2) मी घराघरांत जायचो.

3) आम्ही गढवालचे अनुभव सांगायचो.

4) मुली गावाशी एकरूप व्हायच्या.

5) आपण गावातली माहिती जमवायचो.

6) रमेश नाटकात काम करायचा.
7) पुरुष बाहेरगावी कामाला जायचे.
8) मुलं पटापट झाडांना मिठ्या मारायची.
9) मूल सारखं रडायचं.
10) तू आमच्यात मिसळायचास.
11) तुम्ही गोष्टी सांगायचात.

V उदाहरणानुसार दिलेल्या प्रत्येक वाक्यापासून दोन दोन परिवर्तित वाक्ये बनवा.

1. *उदाहरण:* तू आमच्यात मिसळलास.
तू आमच्यात मिसळायचास.
तू आमच्यात मिसळत असस.

1) मी बसमधून प्रवास केला.
2) आम्ही नागमोडी पायवाटा तुडवल्या.
3) तू गुडगुडी ओढलीस.
4) एखाद्या गृहिणीने शिवणटिपण केले.
5) बायकांनी दळण कांडण केले.
6) म्हातारा खोकला.
7) पोलिस हतबल झाले.
8) मूल अंगणात खेळले.
9) मुलांनी झाडांना मिठ्या मारल्या.

2. *उदाहरण:* मी लहान असताना कविता केल्या.
मी लहान असताना कविता करी.
मी लहान असताना कविता करायचो.

1) तो गावाला गेला.
2) ती रडली.
3) मी लवकर उठलो.
4) ती प्रत्येक शब्दाला हसली.
5) मी निबंध लिहिले.

VI उदाहरणानुसार खालील वाक्ये नकारार्थी करा.

1. *उदाहरण:* मी गावातली माहिती मिळवत असे.
मी गावातली माहिती मिळवत नसे.

1) तिथे एक म्हातारा राहात असे.
2) मी निसर्ग पाहून मोहून जात असे.
3) बापट खेड्यात फेरी मारत असत.
4) रमा गढवालच्या जंगलात जात असे.

2. *उदाहरण:* मी लहान असताना कविता <u>करी</u>.
मी लहान असताना कविता <u>करीत नसे</u>.
   1) तू रोज चित्र काढी.
   2) संजय सतत गावाला जाई.
   3) बायको धान्य कांडी.
   4) मी नेहमी गाणी म्हणी.

3. *उदाहरण:* मी रेल्वेतून प्रवास <u>करायचो</u>.
मी रेल्वेतून प्रवास <u>करीत नसे</u>.
   1) सगळे नाटक करायचे.
   2) गुरंढोरं कुरणात चरायचे.
   3) खेळाडू रोज खेळायचे.
   4) ती रोज धावायची.

VII कंसात दिलेल्या क्रियापदाची योग्य रूपे वापरून परिच्छेद पूर्ण करा.

1. आमच्या वर्गात एक मुलगा होता. तो झाडावर खूप उंच ....... (चढ). आम्ही जवळच्या रानात खूप ....... (भटक) वडाच्या झाडावर सूरपारंब्या ..... (खेळ). धडाधड उड्या ...... (मार). एका मुलाला मात्र ...... ...... (ये). तो रडत ...... (बस). आम्ही त्याला कसेबसे झाडावर ...... (चढवा). पण तो पुन्हा पुन्हा ...... . (पड)

2. आम्ही गप्पा ...... ...... (मार), नागमोडी पायवाटा ...... असू. (तुडव) निसर्ग ...... असू (पाह). कधी आजूबाजूच्या झाडांवरची फळं. ..... ...... (खा) त्या झाडाबद्दल माहिती गोळा ...... असू (कर). मजेत ...... ......(हस) मैलन् मैल आम्ही ...... असू (चाल).

VIII उदाहरणानुसार वाक्ये बदला.

1. उदाहरण: मी निबंध <u>लिहितो</u>.
मी निबंध <u>लिहीत असतो</u>.
   1) मुलगा पुस्तक वाचतो.
   2) मधू शेंगदाण्याचा लाडू खातो.
   3) सचिन तेंडुलकर क्रिकेट खेळतो.
   4) ते नेहमीच उशिरा येतात.
   5) सर्व मुले अभ्यास करतात.

2. उदाहरणानुसार खालील वाक्ये नकारार्थी करा.
*उदाहरण:* मी निबंध लिहीत <u>असतो</u>.
मी निबंध लिहीत <u>नसतो</u>.
   1) निलेश रोज चित्र काढीत असतो.
   2) विजय सतत पुस्तक वाचत असतो.
   3) सर्वजण मैलन् मैल चालत असतात.

4) स्टेशनवर सगळे गाडी पकडण्यासाठी धावत असतात.
5) विद्यार्थी वाचन करत असतात.

3. उदाहरणानुसार वाक्ये बदला.

*उदाहरण:* मी निबंध लिहीन.
मी निबंध लिहीत जाईन.

1) ते रेल्वेतून प्रवास करतील.
2) तो टेनीस खेळेल.
3) आम्ही अभ्यास करू.
4) मुले झाडाला मिठ्या मारतील.

4. उदाहरणानुसार खालील वाक्ये नकारार्थी करा.

*उदाहरण:* मी निबंध लिहीत जाईन.
मी निबंध लिहीत जाणार नाही.

1) सर्वजण मैलन् मैल चालत जातील.
2) विनय चित्र काढत जाईल.
3) गाडी पकडण्यासाठी सर्वजण धावत जातील.
4) तू रोज चित्र काढत जाशील.
5) त्या रेल्वेतून प्रवास करत जातील.

IX 'भटकणे' या क्रियापदावरून 'भटकंती' हा शब्द तयार होतो.

*उदाहरण:* मी गढवलामधे भटकलो.
मी गढवालची भटकंती केली.

अशाच प्रकारे कंसात दिलेल्या क्रियापदाच्या योग्य रूपाचा उपयोग करून वाक्ये पूर्ण करा.

1) मला खूप ........ असते. (फिरणे)
2) राम तिला ........ करतो. (विनवणे)
3) उमाने सायकलची ...... केली. (दुरुस्त करणे)
4) उमेशने डोंगरदऱ्यातून खूप ....... केली. (भ्रमण करणे)

X 'तापणे' शब्दाचा उपयोग अनेक वेगवेगळ्या अर्थात होतो.

*उदाहरण:*
1) लाकडं तापली/ पाणी तापलं.
2) तापामुळे बाळाचं अंग तापलं.
3) गुरुजी दंगा करणाऱ्या मुलांवर तापले.
4) रडणाऱ्या मुलानं आईला फार ताप दिला.

अशाच प्रकारे प्रत्येक अर्थाचे एक-एक वाक्य बनवा.

**पढिए और समझिए।**

आम्ही अलकनंदेच्या खोऱ्यात खूप भटकायचो. कधी जीव मुठीत धरून बसमधून प्रवास करायचो. कधी दाट जंगलातल्या नागमोडी पायवाटा तुडवायचो. रोज निसर्गाचं नवं रूप मोहून टाकायचं.

त्या डोंगरउतारावरल्या गावांची रचना अगदी वैशिष्ट्यपूर्ण असायची. गावं उतारा उतारावर विखरुन वसलेली असायची. घरं दुमजली. रुंदीला कमी लांबीला जास्त. तळमजल्यावर धान्य, पेंढा, चारा वगैरे साठवायचे. वरच्या मजल्यावर लोक राहायचे. घराची बांधणी दगडांची. दोन मोठ्या दगडांमधे चिखल, माती, सिमेंटऐवजी परत छोट्या दगडांच्या चिपा भरलेल्या असायच्या. वर स्लेटच्या दगडांची पसरट कौलं! वरती आतून लाकडी छत! दारं खिडक्या ठेंगण्या ठुसक्या असायच्या. घरापुढे लांबट चौकोनी अंगण. तिथे एखादा पांढरीशुभ्र दाढी असलेला म्हातारा गुडगुडी ओढत छानपैकी पाठीवर ऊन घेत बसलेला दिसायचा. एखादी गृहिणी शिवण टिपण करताना दिसायची. एखाद्या कोपऱ्यात धान्य कांडायला छोटंसं उखळ असायचं. रामप्रहरी मुसळीचा लयबद्ध आवाज घुमायचा. जोडीला एखादं गीतही कानावर पडायचं. मला बहिणाबाईंची गाणी आठवायची.

ह्याच शांत साध्यासुध्या बायका जंगलतोडीला ठेकेदार आले की सिंहीणी व्हायच्या. बायकापोरं पटापट झाडांना मिठ्या मारायची. चिपकायची. ठेकेदाराची माणसं, पोलीस सारेच हतबल व्हायचे.

अजूनही गढवालमधली ती साधीभोळी माणसं आणि त्यांनी वाचवलेली ती घनदाट जंगलं डोळ्यासमोरुन हलत नाहीत.

शब्दार्थ

| | |
|---|---|
| खोरे | वादी, घाटी |
| जीव मुठीत धरुन | जी (दिल) थाम कर |
| दाट | घना |
| नागमोडी | बलखाती |
| वाटा तुडवणे | खूब-चलना |
| रूप | स्वरुप, रूप |
| मोह | आकर्षण, मोह |
| उतार | ढलान, उतार |
| विखरून | फैला हुआ |
| वसलेली | बैठी हुई |
| रुंदी | चौड़ाई |
| लांबी | लंबाई |
| जास्त | ज़्यादा |
| तळमजला | निचली मंजिल |
| धान्य | धान |
| पेंढा | पुआल का गट्ठा (गठरी) |

| | |
|---|---|
| चारा | धास, चारा |
| साठवणे | संग्रह करना |
| राहणे | रहना |
| बांधणी | बनावट |
| चिखल | दलदल, कीचड़ |
| चिपा | पत्थर के टुकडे |
| पसरट | चिपटा (परैल) |
| कौल | खपरैल |
| छत | छत |
| ठेंगणी | ठिगनी |
| अंगण | आँगन |
| म्हातारा | बूढ़ा |
| गुडगुडी | गुड़गुड़ी (हुक्का) |
| ओढणे | पीना (हुक्का आदि) |
| ऊन | धूप |
| शिवण टिपण | सिलाई आदि |
| कांडणे | कूटना |
| मुसळ | मूसल |
| लयबद्ध | लयबद्ध |
| आठवणे | याद आना |
| सिंहिणी | सिंहनी |
| मिठी मारणे | आलिंगन करना |
| हतबल होणे | लाचार होना |
| वाचवणे | बचाना |

## अभ्यास

I खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.

1) आम्ही कुठे भटकत होतो?
2) डोंगर उतारावरल्या गावांची रचना कशी असायची?
3) घरे कशी बांघलेली असायची?
4) रामप्रहरी कसला लयबद्ध आवाज घुमायचा?
5) साध्यासुध्या बायकांच्या धीटपणाच्या वर्णनासाठी कोणता शब्द वापरला आहे?

II खाली दिलेले वाक्यांश पूर्ण करा.

1) ठेंगणं ....... घर
2) नाग ....... पायवाट
3) शिवण ....... करणे
4) पांढरी ....... दाढी
5) घन ....... अरण्य

6) स्थळ ....... बंधन
7) लय ........ आवाज
8) साध्या ....... बायका

III योग्य अक्षरे जोडून शब्द पूर्ण करा.

1) अ ..... ..... नं ..... च्या
2) पा ..... वा .....
3) डों ग ..... उ ..... ..... व ..... ल्या
4) ..... ळ म ..... ल्या व .....
5) रा म ..... ..... री
6) ब ..... णा ..... ई .....
7) ..... ग ..... तो डी .....
8) ग ढ वा ..... ..... ..... ली
9) घ ..... दा .....
10) डो ळ्या ..... मो ..... .....

खाली दिलेल्या शब्दांमधून पाठात आलेले शब्द ओळखा व ते सांगा.

खोऱ्यात, मुठीत, राजा, नागमोडी, तुडवायचो, विखरून, गावं, शहर, गाय, चारा, माती, पसरत, पायरी, काळी, खिडक्या, गुडगुडी, सिगारेट, उखळ, मुसळ, गीत, गाणी, प्यायचो, कंत्राटदार, सिंहीणी, वाघीण, पोलीस, कैदी माणसं, पळत, हलत.

IV हिंदीत भाषांतर करा आणि समर्पक शीर्षक द्या.

प्रगतिपथाकडे वाटचाल करणारा विद्यार्थी सकाळी सूर्योदयापूर्वी उठत असतो. नित्यकर्म केल्यानंतर तो स्नान करत असतो. त्यानंतर तो परमेश्वराची प्रार्थना करत असतो की, तू सतत माझा मार्गदर्शक व रक्षक राहा. पूजेनंतर व्यायाम करणे उत्तम विद्यार्थ्यासाठी आवश्यक आहे. त्याशिवाय शरीर सुंदर, सबल आणि प्रमाणबद्ध होत नसते. ज्या मंदिरात सौंदर्य नसते त्यात विराजमान असणारी मूर्ती कधीही सुंदर असत नाही. व्यायामानंतर थोडे जलपान करणे हितावह असते. त्यानंतर रोजचे वर्तमानपत्रही वाचणे आवश्यक आहे. त्याद्वारा देश, जग, शहर आणि आसपासच्या घडामोडींविषयी माहिती मिळते. ही माहिती नसली तर कधी कधी खूप नुकसान होते. वर्तमानपत्र वाचल्यानंतर विद्यार्थी आपल्या पाठ्यविषयाचा अभ्यास करत असतो. त्यावर विचार करायचा प्रयत्न करत असतो. अशा प्रकारचे संस्कार झालेले विद्यार्थी पूर्वीसुद्धा उत्तम यश मिळवत असत आणि आजही मिळवत असतात. मी सुद्धा विद्यार्थी असताना पहाटे लवकर उठत असे. नंतर स्नान करायचो, पूजा करायचो. तसेच मी व्यायामही करी. आजही हे सर्व मी करत असतो. आमचे सर म्हणायचे, "जो नियमित अभ्यास करत जाईल तोच यशस्वी होईल. जर तुम्ही रोज काहीतरी लिहीत जाल तर तुम्हालाच त्याचा भविष्यात उपयोग होणार आहे. जो विद्यार्थीदशेत कष्ट करत जाणार नाही त्याला पुढे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल." म्हणून मी विद्यार्थीदशेपासूनच खूप

कष्ट करत असे. आमचे सर आम्हाला मार्गदर्शन करत असत. ते म्हणायचे, "विद्यार्थाने शिक्षणही असेच घ्यावे की तो स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करू शकेल. शिक्षणात स्वावलंबन, चारित्र्य, नैतिकता, सेवाभाव, स्वार्थत्याग, धैर्य, राष्ट्रनिष्ठा, मानसिक संतुलन इ. मूल्ये असायला पाहिजेत. ती सर्व विद्यार्थी आत्मसात करू शकला पाहिजे. जर तो ही मूल्ये आत्मसात करू शकत नसेल तर असे शिक्षण व असा विद्यार्थी उपयोगाचा नाही. जो ही मूल्ये आत्मसात करू शकतो तोच खरा विद्यार्थी! आणि जे शिक्षण ही मूल्ये विद्यार्थ्यावर बिंबवू शकते तेच खरे शिक्षण!" आम्ही विद्यार्थीदशेत खूप मेहनत केली. त्याचे फळ आता आम्हाला मिळते आहे. आम्ही जीवनात यशस्वी झालो आहोत. कष्ट न करणारे विद्यार्थी अयशस्वी झाले आहेत. शाळेत असताना आम्ही गाणी म्हणायचो, भाषणं द्यायचो, नाटकं करत असू, स्पर्धेत भाग घ्यायचो, जिंकायचो आणि हरायचोही! आमचा एक मित्र खूप वेगात पळे, एकजण सतत काही ना काही वाची. आम्ही आमच्या सर्व मित्रांचा एक गट तयार केला आहे. उद्या आम्ही सर्वजण भेटणार आहोत. बोलता बोलता जुन्या आठवणींना उजाळा देणार आहोत. गप्पा करतानाच चहानाश्ताही घेऊ. चहा घेऊन झाला की हसत हसत आनंदाने घरी जाऊ. तुम्ही पण येणार का आमच्याबरोबर? तुम्ही आदर्श विद्यार्थी होण्यासाठी वरीलप्रमाणे प्रयत्न करणार ना? निदान प्रयत्न करायला तरी काहीच हरकत नाही. सुधारणा आपोआप होत जाईल. कारण "आधी कष्ट, मग फळ" हेच खरे!

V मराठीत भाषांतर करा.

'चिपको' आंदोलन के कारण देश की जनता को पेड़ों का महत्त्व समझ में आ रहा है। पेड़ देश की संपत्ति है। पेड़ों को काटने से हर तरफ रेगिस्तान हो जाएगा। वर्षा नहीं होगी। नदियों में पानी कम हो जाएगा। सब तरफ वीरानी हो जाएगी और मनुष्य को बहुत सी कठिनाईयों का सामना करना पड़ेगा। 'एक पेड़ काटो तो एक पेड़ लगाओ' - इस अभियान का अगर सभी लोग अनुसरण करें तो अनेक मुसीबतों से बच सकते हैं।

वे कुछ दिन कितने सुंदर थे। सब मिल जुलकर रहते थे। आपस के भेद-भाव बातचीत द्वारा दूर हो जाते थे। सब बड़ों का सम्मान करते थे। बड़े छोटों को प्यार करते थे। अपने पराए का भेद नहीं था। गाँव का जीवन बेहतर माना जाता था। भारत गाँव में ही बसता था। गाँव में सारी जरूरतें पूरी हो जाती थीं। सभी अपने हाथों अपना काम करते थे। बुनकर कपड़ा बनता था। किसान अनाज देकर कपड़ा ले लेता था। इसी तरह जरूरत की चीजें आदान-प्रदान के द्वारा मिल जाती थीं। सब मिलकर पर्यावरण की रक्षा करते थे। खूब हरियाली बनी रहती थी। खूब वर्षा होती थी। जीवन और जगत में संतुलन था।

लेकिन आजकल जनसंख्या बढ़ती जा रही है। इसलिए कई समस्याएँ निर्माण हो रही हैं। शहरों में ज्यादा भीड़ होती जा रही है। लोग पेड़पौधों को काटते जा रहे हैं। इससे पर्यावरण का ऱ्हास होता जा रहा है। अगर पर्यावरण को बचाना है तो पेड़ो की रक्षा करनी पड़ेगी। हर एक को पर्यावरण के बारें में जागृति रखनी पड़ेगी। पर्यावरण बचाने के लिए प्रत्येक व्यक्ति को प्रयत्न करना होगा। ऐसा करने से हम

केवल पर्यावरण को ही नहीं बल्कि समग्र मानव जाति को बचा सकते हैं। यही हमारा कर्तव्य भी है।

VI 'झाडे लावा-झाडे जगवा' या विषयावर एक छोटा निबंध मराठीत लिहा.

टिप्पणियाँ

1. पाठ 9 में आपने पढ़ा है कि मूल क्रिया से '-त' प्रत्यय लगाकर अंत में 'अस' क्रिया के उपयुक्त रूपों का प्रयोग कर मराठी में 'अभ्यासिक वर्तमानकालिक' क्रियाएँ बनती हैं। इस पाठ में 'अभ्यासिक काल' का परिचय विस्तारपूर्वक दिया गया है।

नीचे दिए गए वाक्यों के रेखांकित क्रियारूपों पर ध्यान दीजिए।

*उदाहरण:*

1) पण मग परत आल्यावर चिपको आंदोलनाच्या बाबतीत काय <u>करत असता</u>?
पर वापस आने के बाद चिपको आंदोलन के बारे में क्या करते रहते हो?

2) हल्ली तुम्ही काय <u>करत असता</u>?
आजकल आप क्या करते रहते हो?

3) अजूनही तुम्ही जंगलात <u>जात असता</u> का?
आप अभी भी जंगल में जाते रहते क्या?

उपर्युक्त वाक्यों के रेखांकित क्रिया रूपों में 'अभ्यासिक वर्तमान काल' का प्रयोग किया गया है।

2. मराठी में 'अभ्यासिक भूतकाल' के क्रियारूप तीन प्रकार से बनाए जाते हैं।

प्रथम प्रकार: मराठी में मूल क्रिया में '-आयचा' प्रत्यय लगाकर उसके साथ लिंग, वचन, पुरुष सूचक प्रत्यय लगाकर 'अभ्यासिक भूतकाल' के क्रियारूप बनते हैं।

नीचे दिए गए वाक्यों के रेखांकित क्रियारूपों पर ध्यान दीजिए।

*उदाहरण:*

| | | |
|---|---|---|
| 1) | आम्ही जंगलातल्या वस्त्यांमध्ये <u>जायचो</u>. | हम जंगल की बस्तियों में जाया करते थे। |
| 2) | लोकांना जंगलांचं महत्त्व पटवून <u>द्यायचो</u>. | लोगों को जंगलों का महत्त्व समझाया करते थे। |
| 3) | आम्ही गावकऱ्यांत <u>मिसळायचो</u>. | हम गाँव वालों से हिल-मिल जाया करते थे। |

नीचे 'जा' मूल क्रिया में - '-आयचा' प्रत्यय जोड़कर' बननेवाले 'अभ्यासिक भूतकालिक' क्रियारूप दिए गए हैं।

| | | *एकवचन* | | *बहुवचन* |
|---|---|---|---|---|
| *उ.पु.* | *(पु.)* | मी जायचो.<br>मैं जाया करता था। | आम्ही } | जायचो.<br>हम जाया करते थे। |
| | *(स्त्री.)* | मी जायची.<br>मैं जाया करती थी। | आपण } | हम जाया करती थीं। |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| *म.पु.* | *(पु.)* | तू जायचास<br>तूम जाया करता था। | तुम्ही | जायचात.<br>आप जाया करते थे। |
| | *(स्त्री.)* | तू जायचीस<br>तूम जाया करती थी। | आपण | आप जाया करती थीं। |
| *अ.पु.* | *(पु.)* | तो जायचा.<br>वह जाया करता था। | ते जायचे.<br>वे जाया करते थे। | |
| | *(स्त्री.)* | ती जायची.<br>वह जाया करती थी। | त्या जायच्या.<br>वे जाया करती थीं। | |
| | *(नपुं.)* | ते जायचं. | ती जायची. | |

इनका निषेध वाचक रूप बनाने के लिए क्रिया के पश्चात 'नाही' जोडा जाता है।

| | | *एकवचन* | | *बहुवचन* |
|---|---|---|---|---|
| *उ.पु.* | *(पु.)* | मी जायचो नाही.<br>मैं नहीं जाया करता था। | आम्ही | जायचो नाही.<br>हम नहीं जाया करते थे। |
| | *(स्त्री.)* | मी जायची नाही.<br>मैं नहीं जाया करती थी। | आपण | हम नहीं जाया करती थीं। |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| *म.पु.* | *(पु.)* | तू जायचा नाहीस.<br>तुम नहीं जाया करता था। | तुम्ही | जायचा नाहीत.<br>आप नहीं जाया करते थे। |
| | *(स्त्री.)* | तू जायची नाहीस.<br>तू नहीं जाया करती थी। | आपण | आप नहीं जाया करती थीं। |
| *अ.पु.* | *(पु.)* | तो जायचा नाही.<br>वह नहीं जाया करता था। | ते जायचे नाहीत.<br>वे नहीं जाया करते थे। | |
| | *(स्त्री.)* | ती जायची नाही.<br>वह नहीं जाया करती थी। | त्या जायच्या नाहीत.<br>वे नहीं जाया करती थीं। | |
| | *(नपुं.)* | ते जायचं नाही. | ती जायची नाहीत. | |

द्वितीय प्रकार : मराठी में मूल क्रिया में '-त' प्रत्यय लगाकर अंत में 'अस' क्रिया के उपयुक्त रूपों का प्रयोगकर भी अभ्यासिक भूतकालिक क्रियाएँ बनती हैं।

नीचे दिए गए वाक्यों के रेखांकित क्रियारूपों पर ध्यान दीजिए।

*उदाहरण:*

| | | |
|---|---|---|
| 1) | आम्ही अलकनंदेच्या किनाऱ्यावरील गावन्‌गाव भटकत असू. | अलकनंदा के किनारे के गाँव-गाँव (हम) घूमा करते थे। |
| 2) | कुणी नुसतेच गावकऱ्यांशी गप्पा मारत असे. | कुछ (लोग) जाकर गाँववालों के साथ बातें किया करते थे। |

नीचे 'जा' मूल क्रिया में '-त' प्रत्यय लगाकर 'अस' क्रिया के उपयुक्त रूपों का प्रयोग कर बननेवाले अभ्यासिक भूतकालिक क्रियारूप दिए गए है।

| | *एकवचन* | | *बहुवचन* | |
|---|---|---|---|---|
| *उत्तम पुरुष* | मी जात असे. | | आम्ही<br>आपण | जात असू. |
| | मैं जाया करता था।/<br>करती थी। | | | हम जाया करते थे।/<br>करती थीं। |
| *मध्यम पुरुष* | तू जात असंस | | तुम्ही<br>आपण | जात असा.<br>आप जाया करते थे।/<br>करती थी। |
| | तू जाया करता था।/<br>करती थी। | | | |
| *अन्य पुरुष* | तो<br>ती<br>ते | जात असे<br>वह जाया करता था/<br>करती थी। | ते<br>त्या<br>ती | जात असत.<br>वे जाया करते थे/<br>करती थीं। |

ध्यान दें कि, इस प्रकार की क्रिया में लिंग के कारण भेद नहीं होता। इनका निषेध वाचक रूप बनाने के लिए 'अस' क्रिया के स्थान पर 'नस' क्रिया के उपयुक्त रूपों का प्रयोग किया जाता हैं।

तृतीय प्रकार : मराठी में मूल क्रिया में '-ई' अथवा '-ए' प्रत्यय लगाकर अभ्यासिक भूतकालिक क्रियाएँ बनती हैं। स्वरांत क्रियाओं के साथ '-ई' प्रत्यय जोडकर और व्यंजनांत क्रियाओं के साथ '-ए' प्रत्यय जोडकर अभ्यासिक भूतकालिक क्रियाएँ बनती हैं।

नीचे 'जा' मूल क्रिया में '-ई' प्रत्यय लगाकर बननेवाले अभ्यासिक भूतकालिक क्रिया रूप दिए गए हैं।

| | *एकवचन* | | *बहुवचन* | |
|---|---|---|---|---|
| *उत्तम पुरुष* | मी जाई | | (जा + ई) | |
| | मैं जाया करता/करती थी। | | | |
| *अन्य पुरुष* | तो<br>ती<br>ते | जाई. | ते<br>त्या<br>ती | जात. |
| | वह जाया करता था/करती थी। | | वे जाया करते थे/करती थीं। | |

नीचे 'धाव' (दौडना) मूल क्रिया में '-ए' प्रत्यय लगाकर बननेवाले अभ्यासिक भूतकालिक क्रिया रूप दिए गए हैं।

| | *एकवचन* | *बहुवचन* |
|---|---|---|
| *उत्तमपुरुष* | मी धावे. (धाव + ए) | --- |

| | | |
|---|---|---|
| | मैं दौडा करता था/करती थी। | |
| *अन्यपुरुष* | तो/ती/ते धावे. | ते/त्या/ती धावत. |
| | वह दौडा करता था/करती थी। | वे दौडा करते थे/करती थीं। |

ध्यान दें कि, इस प्रकार के रूप सभी पुरुष वचनों में नहीं बनते हैं। केवल उपर्युक्त रूप बनते हैं। इस प्रकार के वाक्यों के निषेध वाचक रूप मूल क्रिया में '-त' प्रत्यय लगाकर अंत में 'नस' क्रिया के उपयुक्त रूपों का प्रयोग कर बनते हैं।

3) नीचे दिए गए वाक्यों के रेखांकित क्रियारूपों पर ध्यान दीजिए।

*उदाहरण:*

| | | |
|---|---|---|
| 1) | मी ही येत जाईन तुमच्याबरोबर. | मैं भी तुम्हारे साथ आया करूँगा। |
| 2) | चिपको आंदोलनाचं काम करत जाईन. | चिपको आंदोलन का काम किया करूँगा। |
| 3) | त्यातून मला मानसिक समाधानही मिळत जाईल. | उससे मुझे मानसिक समाधान भी मिलता रहेगा। |

मराठी में मूल क्रिया में '-त' प्रत्यय लगाकर अंत में 'जा' क्रिया के उपयुक्त रूपों का प्रयोग कर अभ्यासिक भविष्यत् कालिक क्रिया रूप बनाए जाते हैं।

नीचे 'खा' मूल क्रिया में '-त' प्रत्यय लगाकर अंत में 'जा' क्रिया के उपयुक्त रूपों का प्रयोग कर बननेवाले अभ्यासिक भविष्यत् कालिक क्रिया रूप दिए गए हैं।

| | *एकवचन* | *बहुवचन* |
|---|---|---|
| *उ.पु.* | मी खात जाईन. | आम्ही/आपण खात जाऊ. |
| | मैं खाया करूँगा/करूँगी। | हम खाया करेंगे/करेंगी। |
| *म.पु.* | तू खात जाशील. | तुम्ही/आपण खात जाल. |
| | तू खाया करेगा/करेगी। | आप खाया करेंगे/करेंगी। |
| *अ.पु.* | तो/ती/ते खात जाईल. | ते/त्या/ती खात जातील. |
| | वह खाया करेगा/करेगी। | वे खाया करेंगे/करेंगी। |

ध्यान दें कि, मराठी में अभ्यासिक भविष्यत्कालिक क्रिया रूपों में लिंग के कारण भेद नहीं होता। केवल वचन और पुरुष के अनुसार भेद होता हैं। इन के निषेधवाचक रूप 'जा' क्रिया को '-णार' प्रत्यय लगाकर अंत में 'नाही' का प्रयोग कर बनते हैं।